विषय:- शिक्षण सेवकांना तीन वर्ष समाधानकारक काम केल्यानंतर प्राथमिक शिक्षकांच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देणेबाबत

जिल्हा परिषद अहमदनगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
आदेश क्र.कार्या-१/पीई-१/ ५३२/२०१८ दि.१५/१२/२०१८

**वाचा :-** १.शासन निर्णय क्र पीआरई/२००२/३३९५/प्राशि-१ दि.२७ फेब्रुवारी २००३
२. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र पीआरई/२००३/(३४७२)/प्राशि-१ दि.९/४/२००३
३. शासन निर्णय क्र अनियो/१००५/१२६/सेवा-४ दि.३०/१०/२००५
४. शासन परिपत्रक क्र सेनिवे/१००८/१६/सेवा-४ दि.३१/१०/२००५
५. शासन शुध्दीपत्रक क्रमांक एसएसएन-१००९/(३८६/०९) /मांशि-२ दिनांक २५/०३/२०१३
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक प्राशिस/२०१५/प्र.रजा. /१८१७५/ड-५०२/२२२१ दि. २६/०५/२०१५
७. गट शिक्षण अधिकारी, पं.स. श्रीगोंदा यांचेकडील पत्र दि. ०५/११/२०१८ व दि. १२/११/२०१८

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९५(२) ब नुसार व उपरोक्त शासन निर्णय नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर खालील शिक्षण सेवकांचे तीन वर्ष समाधानकारक काम केल्यानंतर रु.६०००/- मानधनावरुन त्यांची सेवा प्राथमिक शिक्षक या पदावर जिल्हा सेवा वर्ग-३ मध्ये वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२०० ग्रेड वेतन रुपये २८००/- मध्ये अनुदेय नसलेल्या अनुपस्थितीचा कालावधी वगळून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून प्राथमिक शिक्षक या पदावर नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. नं. | नाव | शाळा | तालुका | नियमित वेतन श्रेणी देय दिनांक | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दि | म | वर्ष | |
| १ | श्रीम.कलमे ज्योती ज्ञानोबा | काष्टी | श्रीगोंदा | ११ | ६ | २०१८ | |
| २ | श्रीम. कदम शुभांगी किसन | श्रीगोंदा मुली | श्रीगोंदा | ११ | ६ | २०१८ | |

सदर प्राथमिक शिक्षकांच्या नियमित वेतनश्रेणीत नेमणुका खालील नियम व अटीच्या अधिन राहुन करण्यात येत आहे.

१. सदरील नेमणुक ही हंगामी स्वरुपाची आहे.

२ सदर उमेदवारास नोकरी सोडावयाची असेल तर त्यांनी १ महिना अगोदर पूर्व सूचना किंवा १ महिन्याचे मुळ वेतन जि.प. सेस मध्ये भरावे लागेल.

३. उमेदवारास त्याच्या नियुक्ती नंतर कोणत्याही प्रकारची पुर्वी केलेल्या नोकरीमुळे सलगता किंवा नेमणुक मागण्याचा अधिकारी राहणार नाही.

४. शासनाने वेळोवेळी लागू केलेले शासन निर्णय,परिपत्रक,आदेश व नियम आपणावर बंधनकारक राहतील.

५.प्राथमिक शिक्षकांच्या रुपये ५२००-२०२००, ग्रेड वेतन रुपये २८००/- या मध्ये लागु राहील मागिल तीन वर्षाच्या कालावधीच्या वेतनवाढी देय राहणार नाही.

६. आदेशातील संदर्भ क्र ३ व ४ अन्वये **नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना** लागु राहील

७. शैक्षणिक कामकाज व प्रशासकीय बाबीबाबत या पूर्वी शिक्षण सेवक पदी देण्यात आलेल्या अटी व शर्ती आपणावर बंधनकारक राहतील

सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संकेतांक क्रमांक २०१८१२१५१६०३९८ असा आहे.

स्वाक्षरी/-
**( विश्वजीत माने )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर**

प्रति,

१.संबंधीत शिक्षण सेवक व्दारा गट शिक्षण अधिकारी ,पंचायत समिती, श्रीगोंदा

२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीसाठी

३.गट विकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

४. गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा

२/- वरील आदेशाची नोंद मुळसेवा पुस्तकामध्ये घेवून आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी. तसेच संबंधीत प्राथमिक शिक्षकाकडून पुढील नामनिर्देशन पत्रे भरुन घ्यावीत. अ)अंशदायी निवृत्ती वेतन, ब) मृत्यू नि.सेवा उपदान, क) गट विमा योजना. तसेच सेवा पुस्तकामध्ये पुढील कागदपत्रे लावण्यात यावी. १) शारिरीकदृष्या पात्र असलयाचे वैदयकीय प्रमाणपत्र, २) मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र, ३) स्वग्राम घोषणापत्र, ४) शैक्षणिक व प्रशिक्षित अर्हता इत्यादी.

( विश्वजीत माने )

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद अहमदनगर